लोकनेते स्व.गोपीनाथजी मुंडे, माजी उप मुख्यमंत्री, व माजी केंद्रीय मंत्री यांचे औरंगाबाद येथे स्मारक उभारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: स्मारक-२०१५/प्र.क्र.६८/नवि-२४,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २९ मे,२०१९.

संदर्भ :- १) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.स्मारक २०१५/प्र.क्र.६८/नवि-२४,दि.२.६.२०१५
२) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे पत्र क्र.CIDCO/MD/०९, दि.३.१.२०१९.

शासन निर्णय :-

औरंगाबाद येथे लोकनेते स्व.गोपीनाथजी मुंडे यांचे भव्य स्मारक उभारण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याअनुषंगाने स्मारकाचा आराखडा निश्चित करण्यासाठी शासनस्तरावर मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती संदर्भाधीन शासन निर्णय दि.२.६.२०१५ अन्वये गठीत करण्यात आलेली आहे. सदर स्मारक उभारण्याचे काम शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांच्या मार्फत करण्यात येत असून, सदर स्मारक उभारण्याकरिता रु.५०.६१ कोटी निधी मंजूर करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक (सिडको) यांनी संदर्भाधीन दि.३.१.२०१९ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली होती. त्याअनुषंगाने, प्रस्तुत स्मारक उभारण्याकरिता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

अ) स्व.गोपीनाथजी मुंडे,माजी उप मुख्यमंत्री यांच्या औरंगाबाद येथील प्रस्तावित स्मारकासाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी आवश्यक निधी उपलब्ध करावा.

ब) शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी सदर स्मारकाचे काम पूर्ण करून स्मारक औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरित करावे. तद्‌नंतर, प्रस्तुत स्मारकाच्या देखभालीचे व व्यवस्थापनाचे काम औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे.

क) शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) हे या स्मारकाचे काम पूर्ण करुन औरंगाबाद महानगरपालिकेकडे सूपूर्द करणार असल्यामुळे या स्मारकाच्या अनुषंगाने आवश्यक तो करारनामा सिडको व महानगरपालिका यांच्यामध्ये करण्यात यावा.

३. उपरोक्त नमूद निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

४. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०५२९१६५२३८१४२५ असा आहे हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradeep Patil

Digitally signed by Pradeep Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05334a0514755cf2d85a6ca44c91e73cfa81323e994582a4a27e428d216ef701, cn=Pradeep Patil
Date: 2019.05.29 17:53:10 +05'30'

(प्रदिप पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव,मंत्रालय,मुंबई-३२
२) प्रधान सचिव, (नवि-१), नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.
३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
४) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.
५) जिल्हाधिकारी, औरंगाबाद
६) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको,निर्मल, दुसरा मजला,नरीमन पॉईंट,मुं.२१.
७) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई ३२.
८) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई ३२.
९) प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
१०)अवर सचिव (नवि-१०),नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.
११)निवड नस्ती (नवि-२४)